सहा. जिल्हा. गडचिरोली तथा उपविभागीय अधिकारी
गडचिरोली यांचे कार्यालय
क्र. उविअ/अका भूसं/कावी/ 665 /2016.
दिनांक :- 15 फेब्रुवारी, 2016.

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
गडचिरोली

विषय :- वन जमिन कोटगल बॅरेज/अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वननिवासी अधिनियम (वनहक्क कायदा) 2006 अंतर्गत प्रमाणपत्र मिळणेबाबत.

संदर्भ :- 1. मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे पत्र क्र.कार्या-3/अ.का.जमीन-1/कावि/1121/2015.
2. तहसिलदार, गडचिरोली यांचे आपले कार्यालयीन पत्र क्र/कावि/अका-प्र-1/48/2016 दिनांक 10.2.2016.

महोदय,

उपरोक्त विषयांचे अनुषंगाने कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग चंद्रपूर यांनी कोटगल बॅरेज करीता मौजा कोटगल, विसापूर, गडचिरोली, महादवाडीचक, चुरचुरामाल, माखरा व दिभनाचक येथील वनजमिन अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वननिवासी अधिनियम (वनहक्क कायदा) 2006 अंतर्गत प्रमाणपत्र मिळण्यांकरीता प्रस्ताव सादर केलेला होता. त्यानूसार तहसिलदार, गडचिरोली यांचेकडून वनहक्क कायदया अंतर्गत नागरीकांचे किंवा अन्य प्रयोजनाकरीता वनहक्क बाधीत होते किंवा नाही याबाबतचा स्वतंत्र अहवाल सादर करण्यास कळविण्यात आलेले होते. तहसिलदार, गडचिरोली यांनी संदर्भीय पत्र क्र.2 अन्वये खालील प्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

| अ. क्र. | मौजा कोटगल | कोटगल बॅरेज करीता मागणी केलले क्षेत्राचा तपशिल | | | वनहक्क पट्टे वाटप/अतिक्रमीत/ अन्य प्रयोजनाकरीता बाधित होत नसलेले स.नं. क्षेत्र | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकुण स.न. | क्षेत्र हे.आर. | कोटगल बॅरेज करीता बाधित होत असलेले क्षेत्र हे.आर. | एकुण स.नं. ची संख्या | क्षेत्र हे.आर. | |
| 1. | कोटगल | 23 | 33.77 | 16.02 | 23 | 15.19 | तलाठी अहवाल व तहसिलदार यांचे अहवालामध्ये सविस्तर माहीतीदिलेली आहे. व कोणत्याही नागरीकाचे व अन्य प्रयोजनाकरीता हक्क बाधीत होत नाही. |
| 2. | विसापूर | 01 | 0.48 | 0.48 | 01 | 0.48 | |
| 3. | गडचिरोली | 08 | 9.94 | 2.41 | 08 | 2.41 | |
| 4. | महादवाडीचक | 02 | 9.02 | 0.53 | 02 | 0.53 | |
| 5. | चुरचुरमाल | 02 | 40.04 | 0.90 | 02 | 0.90 | |
| 6. | माखरा | 02 | 122.02 | 0.84 | 02 | 0.84 | |
| 7. | दिभनाचक | 03 | 5.16 | 0.30 | 03 | 0.30 | |
| 8. | काटली | **01** | **0.57** | **0.57** | **01** | **0.57** | |
| | **एकूण 8 गांवे** | **42** | **221.00** | **22.05** | **42** | **21.22** | |

तहसिलदार, गडचिरोली यांचे अहवालावरुन मौजा कोटगल, विसापूर, गडचिरोली, महादवाडीचक, चुरचुरमाल, माखरा ,। दिभनाचक व काटली येथील वनहक्क कायदया अंतर्गत नागरीकांचे किंवा अन्य प्रयोजनाकरीता हक्क बाधीत होत नसल्यांचे दिसून येत असल्यांने कोटगल बॅरेज करीता उक्त एकुण 8 गावातील 22.05 हे.आर. क्षेत्रा पैकी 21.22 हे.आर. जागा जागेबाबतचा प्रस्ताव पुढील आवश्यक कार्यवाहीस या सोबत आपणांस सादर करण्यांत येत आहे.

सबब माहीतीस सविनय सादर.

आपला विश्वासू
सहा. जिल्हाधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी.
गडचिरोली

प्रतिलिपी :- कार्यकारी. अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, चंद्रपूर यांना माहीतीस सस्नेह अग्रेषित.

सहा. जिल्हाधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी.
गडचिरोली

Scanned by CamScanner

क्र. कार्या-३/अ.का. जमीन-१/ कावि/९९/२०१५
जिल्हाधिकारी गडचिरोली यांचे कार्यालय
दिनांक :-१८ ऑगस्ट, २०१५.

प्रति,

उपविभागीय अधिकारी,
गडचिरोली

विषय : - वन जमीन कोटगल बॅरेज ता.जि. गडचिरोली
अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी अधिनियम (वनहक्क कायदा) २००६ अंतर्गत प्रमाणपत्र मिळण्याबाबत.

संदर्भ:- कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, चंद्रपूर यांचे पत्र क्र. ३०५८/चिशा-२/कोटगल बॅरेज/वन प्रस्ताव/१५, दिनांक २१/७/२०१५.

*****

उपरोक्त संदर्भीय पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की, कोटगल बॅरेज करीता ५५.६८ हे. आर वन जमीनीचे कोटगल बॅरेज बांधकामाकरीता वनहक्क कायदा- २००६ अंतर्गत प्रमाणपत्र मिळणेबाबत या कार्यालयास विनंती केलेली आहे. याबाबत कोटगल, चुरमुरा माल, साखरा, दिभना, काटली इत्यादी ग्रामसभेने ठराव पारीत करून वनहक्क बाधीत होत नाही. असे अभिप्राय दिलेले आहे. त्या अनुषंगाने उक्त जमीनीला वनहक्क कायद्या अंतर्गत नागरीकांचे किंवा अन्य प्रयोजनाकरीता वनहक्क बाधीत होते किंवा कसे ? त्यावर आपले स्वतंत्र अहवाल तयार करून या कार्यालयाकडून पाठविण्यात आलेल्या ग्रामसभेच्या अहवालसह सादर करावे. यासोबत वर नमुद केलेल्या ग्रामसभेने सादर केलेले ठराव ७/१२ सह आपलेकडे पाठविण्यात येत आहे.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

नि.उ.जि.
जिल्हाधिकारी गडचिरोली करीता

प्रतिलिपी :- कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, चंद्रपूर यांना माहितीस

O/C

17.8.15

Scanned by CamScanner